कायम विनाअनुदानित

विना अनुदानित

पुणे जिल्हा परिषद, पुणे
"यशवंतराव चव्हाण भवन"
शिक्षण विभाग [प्राथमिक] ३८४
जा. क्र. जिप/शिक्षण/प्राथ/२/२१/ /2002

पुणे दिनांक:- / /2002

प्रति,

गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती ~~हवेली~~ जि. पुणे

पंचायत समिती हवेली
शिक्षण विभाग
शाखा
आ. नों. क्र. ......
९५२६
14 AUG 2002
अधिक्षक ग. शि. अ.

विषय :- सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात नविन खाजगी प्राथमिक शाळांना देण्यात आलेल्या परवानगीचे नूतनीकरण करुन सन-२००१-२००२ या शैक्षणिक वर्षात परवानगी देणे बाबत.

संदर्भ :- १] शासनाकडील शिक्षण सेवायोजन विभाग पत्र क्रमांक-व्हीएलएस/१०००/[५०१/२००० ]/[ १ ]/प्राशि-३, दि-१२/६/२००१
२] शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे पत्र जा. क्र. प्रा/प्राशि खाप्राशा/मान्यता/पुवि/३२२८८९/2002 दि-१८/८/2002

९४१८

उपरोक्त विषयानुसार महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग व सेवा योजन विभाग यांनी स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमुद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून, २००० पासून इयत्ता १ली च्या वर्गास [फक्त एका तुकडीत] सन-२०००-२००१ या शैक्षणिक वर्षात देण्यात आलेल्या परवानगीचे नूतनीकरण करुन जुन, २००१ पासून सन-२००१-२००२ या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासह शाळा सुरु करण्यास खाली नमुद केलेल्या अटींची पुर्तता करण्याच्या शर्तीवर विनाअनुदानतत्वावर/कायम विनाअनुदान तत्वावर "खास बाब" म्हणून परवानगी देण्यात येत आहे. तसेच इतर माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विनाअनुदानित तत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटींवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नाव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १) | भारती विद्यापीठ पुणे | भारती विद्यापीठ प्रायमरी ॲण्ड प्री-प्रायमरी इंग्लिश मिडीयम स्कूल, बालेवाडी पुणे | १-४थी वर्ग [प्रत्येक एक तुकडीत] | इंग्रजी |

सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास परवानगी रद्द होईल.

३.१ सदर संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहीजे.

३.२ शाळे[illegible] इमारत व परिसर शिक्षणानुकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहीजे.

३.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

३.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती, संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापन विषयक सुविधा इत्यादी शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

३.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहीजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मूल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सुयोग्य कार्यनियन केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहि

३.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंद[illegible]

(६)



३.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशीरपणा, नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे.

३.८ संस्थेने परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेची जागा इत्यादी, मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

३.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

३.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

३.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

३.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नुतनीकरणासाठी अर्ज सक्षम अधिकाऱ्यांकडे परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

---

ही परवानगी देण्यापुर्वी संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची पुन्हा खात्री करून घेऊन मगच संस्थेला खाजगी शाळेची मान्यता देणे बाबत. कार्यवाही करण्यात यावी.

१. संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व महाराष्ट्र विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी किंवा केवळ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.

२. संस्थे विरुध्द गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

३. सदर संस्थेने चालविलेल्या प्राथ. शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४. संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार चालत असल्याबाबत तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पैशी समाधानकारक आहे.

६. संस्थेने विहित नमुन्यात शुल्कअर्ज केला आहे. [यापूर्वी अर्ज केला नसल्यास तो करून घ्यावा]

७. शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रुपये-१००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

तरी या बाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरीत या कार्यालयात पाठवावा.

शिक्षणाधिकारी [प्राथमिक]
जिल्हा परिषद, पुणे-१

प्रत:- १. मुख्याध्यापक, भारती वि. प्रायमरी ॲण्ड प्री-प्रायमरी इंग्लिश स्कूल, लोहगाव

२. सचिव, भारती विद्यापीठ, लालबहादूर शास्त्री मार्ग, पुणे-३०

३. विस्तार अधिकारी, शिक्षण यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस. सदर शाळेची वार्षिक तपासणी होऊन अहवालाची एक प्रत इकडे न चुकता पाठविण्याची दक्षता घ्यावी.